Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, 539, Rajendranagar, Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, 539, राजेंद्रनगर, कोल्हापूर - 416004

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/लेखा/सन 2025-26 नो.शु व शि.सं. / 2343 दिनांक : 23 / 06 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय : शैक्षणिक वर्ष 2025-2026 साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत.**

**संदर्भ : राज्य मंडळाचे क्र. रा.मं./लेखा-प्रकाशन/2228, दिनांक 19.06.2025 चे ईमेल पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, **राज्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष 2025-2026 चे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क www.mahahsscboard.in या राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सोमवार दिनांक 23.06.2025 पासून स्विकारण्यात येणार आहे.**

माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून मार्च 2025 परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. **दिनांक 10 ऑगस्ट 2025 नंतर प्रचलित पध्दतीनुसार दंडात्मक शुल्कासह नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाची वर्गणी ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाची आहे.** तसेच सदर संकेतस्थळावरून तयार होणारी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम पेमेंट गेटवेद्वारे भरणा करण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली असल्याने कोणत्याही परिस्थितीत विभागीय मंडळ स्तरावर नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम रोखीने स्विकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी

**नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क नवीन संगणक प्रणालीद्वारे मंडळाकडे भरणा केल्याशिवाय फेब्रु/मार्च 2026 मध्ये घेण्यात येणाऱ्या इ.10 वी व इ.12 वी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळास सादर करता येणार नाहीत, याची सर्व मुख्याध्यापक / प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत :

१. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे

D/Ansar/Registration fees/Letter